VOL- VII ISSUE- IX SEPTEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# ऑनलाईन शिक्षण : काळाची गरज

- डॉ.सुनीता सांगोले,
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

चारित्र्यपूर्ण, संपन्न, सर्व क्षमताधिष्ठित ' माणूस ' घडवणे हे समाजासमोर नेहमीच आव्हान राहिले आहे. या आव्हानास पेलण्यासाठी ' शिक्षणव्यवस्था' उदयास आली. मानवाच्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे , मग हे शिक्षण कसे द्यावे, कोणत्या मार्गाने जास्त प्रभावी होईल ? असे प्रश्न माणसाला नेहमीच पडले आहेत. ज्ञान देण्याची पद्धत काळानुसार नेहमीच बदलत गेली आहे. या संदर्भात मला एक प्राचीन दंतकथा आठवते. अमरशक्ती नावाचा राजा उदार, न्यायप्रिय, प्रतापी होता. त्याला बहुशक्ती, उग्रशक्ती आणि अमरशक्ती अशी तीन मुले - व्यवहारशून्य, मूर्ख होती. या मुलांना घडविण्यासाठी राजाला चांगला गुरु हवा होता. त्याने दवंडी पिटवली -विष्णू शर्मा नावाचा व्यक्ती त्याने पैजेचा विडा उचलला. विष्णू शर्मा याने राजकुमारांना सांगितलेल्या गोष्टी म्हणजेच पंचतंत्र- पंचतंत्र या नीति कथा आहेत. व्यवहार चतुर, नैतिक संस्कार करणे हा या कथांचा प्रमुख हेतू आहे. मूल्यशिक्षणासाठी कथेचा रंजक वापर.

माणसाने नेहमीच शिक्षणाचे मार्ग शोधले. प्राप्त परिस्थितीत ज्या पद्धतीने शिक्षण घेता येईल ते मार्ग स्वीकारले. त्यात गुरुकूल पद्धत- नैतिक संस्कार, मूल्य शिकवण याला कृतीची जोड दिली.

**काळाची गरज :**

आधुनिक काळात आपण शाळा, महाविद्यालयांच्या माध्यमातून शिक्षण देतो. कोरोनाच्या प्रादुर्भावाचा हा काळ संकटाचा आहे. त्यात आता जून महिना दुसरा आठवडा संपत आला आहे. जून महिना सुरु झाला की दोन गोष्टींचे वेध लागतात. एक पाऊस आणि दुसरी शाळा-महाविद्यालयाचा पहिला दिवस. त्यासाठी प्रवेश घेण्याची धडपड, शाळा-महाविद्यालयासाठी लागणारे साहित्य, पुस्तक, वह्या, बॅग या सगळ्या खरेदी एव्हाना झाल्या असायच्या पण सध्याच्या परिस्थितीत हे सारे चित्रच पालटलेले दिसते.

काही प्रमाणात टाळेबंदी शिथिल झाली असली तरी शाळा, कॉलेज सारख्या संस्था पूर्ववत सुरु करण्याची ही परिस्थिती नाही. या पार्श्वभूमीवर हे शैक्षणिक वर्ष एका वेगळ्या स्वरुपात सुरु होताना दिसत आहे. डिजीटलच्या माध्यमातून ई-लर्निंगची ही रूजुवात घट्ट होते आहे. त्या दिशेने एक वेग घेतलेला दिसून येतो. कोणताही नवा बदल अंगीकारताना त्याच्याशी जुळवून घेताना समाजात त्याचे बरे-वाईट अनुभवांचे पडसाद उमटणे स्वाभाविक होय.

खरे तर इंटरनेटचा उदय, त्याचा सहजी वापर सुरु झाल्यानंतर ऑनलाईन कोर्सेस ही तरुणाईलाही काही नवलाची गोष्ट उरली नाही. असे कौशल्याचे ऑनलाईन कोर्सेस महाविद्यलयीन विद्यार्थी करतच होते. राहिला प्रश्न तो बोर्ड किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम. जो आपण प्रत्यक्ष वर्गात बसून अध्ययन करत होतो तो त्यासाठी आज वर्गात एकत्र बसून शिकणे आरोग्याबद्दल गंभीर धोका पत्करणे आहे. अशा परिस्थितीत गरज महणून का होईना आपण तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारत आहोत. ज्यांच्याजवळ जशी साधनांची उपलब्धता आहे तसे हे शिक्षण देण्याचा आणि आत्मसात करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

शिक्षण म्हणजे केवळ वही-पेन नव्हे तर बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे आणि शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग आहे. काळ-परिस्थितीनुसार समाजात, परिवर्तन होणे अटळ असते. शिक्षण हे जीवनासाठीची तयारी नसून जीवन हे शिक्षण आहे. बदल हा शिक्षणाचा अंतिम

परिणाम आहे. अशा शिक्षणाचे अनंत प्रकार आहेत म्हणण्यापेक्षा अनंत प्रकारांनी शिक्षण घेता येते.

ऑनलाईन अध्यापन सुरु झालेल्या बातम्या येतात न येतात तोच त्याबद्दलच्या सकारात्मक / नकारात्मक प्रतिक्रिया त्यावरच्या साधक-बाधक चर्चा सुरु झाल्या. मग संकेतस्थळ कट्ट्यावर असो किंवा प्रसाराच्या इतर माध्यमांतून ते होणे क्रमप्राप्त आहे आणि योग्यही. फक्त खंत एवढीच वाटते की एखाद्या विषयावर मत नोंदवताना विशेषतः समाज माध्यमांवर, त्याचा सांगोपांग, चौफेर, वस्तुस्थितीस धरुन मांडणी व्हायला हवी.

परवा एका चांगल्या गोष्टीने माझे लक्ष वेधले. नवव्या वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने 'डॉ. होमी भाभा ' या परीक्षेच्या तिसऱ्या पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला होता. यासाठी त्याने जो 'कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर' या विषयावरील प्रकल्प सादर केला होता. त्यामध्ये खूपच महत्त्वपूर्ण आणि मूलगामी संशोधनासाठी धागे सापडतात. अर्थात कमी वयाच्या मुलाचे मौखिक परीक्षेतील ज्ञानही मी जोखले. आपण विचार करतो त्याच्या कितीतरी पलिकडे त्यांचे विचार, ज्ञान होते. त्याला मी विचारले, तू इतके ज्ञान कसे प्राप्त केलेस, मार्गदर्शक कोण ? तो म्हणाला सर होते. त्यांनी मला वेगवेगळ्या साईटस् सांगितल्या, त्यावर मी माहिती शोधली, जिज्ञासा म्हणून सखोल अभ्यास केला. हा प्रकल्प करताना मला दोन गुरु होते. एक शाळेतले माझे शिक्षक आणि गुगल गुरु. हे त्याचे बोल, त्याच्या बोलण्यातला आत्मविश्वास, प्रकल्पातून त्याची अभिव्यक्त होणारी ज्ञान लालसा, तिच्या तृप्तीसाठी केवळ शाळा किंवा ठराविक साचेबद्ध अभ्यासक्रम पुरेसा नाही. असे अनेक विद्यार्थी असतात ज्यांना चौकटीच्या पलिकडचे हे ज्ञान हवे असते शिक्षकाने ते त्याला मिळवून द्यावे, त्याचे समाधान करावे, त्याला हे ज्ञान कसे मिळवता येईल याची वाट दाखवावी. इंटरनेटच्या शिक्षणातील वापराने इतके चांगले परिणाम (आऊटपूट ) मिळत असतील तर .... विचार व्हावा.

आजची पिढी, विशेषतः तरुणाई , नव्या बदलाला धीटपणे सामोरी जाणारी आहे. बदल ट्रेण्ड म्हणून स्वीकरण्याचे धाडस त्यांच्याकडे आहे, किंबहुना त्यांची ज्ञानाची गरज त्यांना नव्या माध्यमांकडे खेचते आहे. असे म्हणणे अतिशयोक्ति होणार नाही. ऑनलाईन अध्ययन-अध्यापनाचा फायदा असा आहे. विद्यार्थ्याला मुक्तपणे शिक्षण घेता येते. त्याला आवडीप्रमाणे शिक्षण घेता येऊ शकते. या शिक्षणाचे फायदा सांगताना मी खालील मुद्यांकडे लक्ष वेधू इच्छिते.

**फायदे :**

१. तात्काळ उपलब्धता - शैक्षणिक साहित्य प्रकाशित केल्यानंतर लगेच जगातील कुठल्याही ठिकाणी आलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत ते पोहचू शकते.
२. तिप्पट कार्यक्षमता.
३. कुठेही आणि केव्हाही
४. विद्यार्थ्यांच्या गरजेनुरुप / क्षमतेनुरुप शिक्षण साहित्याचे किंवा सादरीकरणातील बदल विद्यार्थ्यांसाठी फारच उपयुक्त ठरतात.

**तोटे :**

१. विशेष क्षमतांची गरज - विद्यार्थी आणि शिक्षक दोघांसाठीही आहे पण तशी क्षमता नाही.
२. आधारभूत संरचनेची गरज ( Infrastrucuture ) - विद्युत, संगणक, इंटरनेट सुविधा असायला हवी.
३. तंत्रज्ञानयुक्त होण्यासाठी मोजावी लागणारी किंमत ही बाब महत्त्वाची आहे. शैक्षणिक संस्थेला, किमान भांडवलाची गुंतवणूक करणे, विद्यार्थ्यांना देखील करणे आवश्यक आहे.
यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा, शैक्षणिक संस्थांनीही अग्रेसर व्हावे.

*** कुठल्याही शिक्षण प्रक्रियेचे प्रमुख पाच टप्पे असावेत.**

१. शिकण्याचे उद्दिष्ट ठरवणे.
२. शिकण्यासाठी आवश्यक माहितीचे आदान-प्रदान करणे.
३. आंतरक्रियात्मक असलेल्या सहयोग असलेल्या शैक्षणिक कृतींमध्ये सहभाग.
४. शिकण्याच्या उद्दिष्टाप्रमाणे केलेले मूल्यमापन.
५. शिकण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी दिलेले प्रत्याभरण.

हे सगळे टप्पे औपचारिक शिक्षण व्यवस्थेत हेतूपूर्वक पूर्ण करण्याची अपेक्षा असते. जीवन शिक्षणाच्या निरंतर प्रक्रियेत हेच टप्पे निर्हेतूकपणे पार पडतात. खरे तर मूल्यमापन आणि प्रत्याभरण हे दोन घटक अतिशय

महत्त्वपूर्ण पण विद्यार्थी संख्या आणि पारंपारिक पद्धतीमुळे या महत्वाच्या बाबींवर लक्ष देण्यास शिक्षकांना वेळच पूरत नाही. परिणामी दुर्लक्ष होते. ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेताना विद्यार्थ्यास रेकॉर्डिंग करता येते. पुन्हा-पुन्हा पाहता येते. नीट आकलनास या गोष्टी महत्वाच्या. दुसरे असे की, आकलन क्षमतेनुसार त्याला हे साधन वापरता येते. ई-लर्निंगमुळे स्थळ काळाची लवचिकता असते. क्षमतेप्रमाणे ज्ञान प्राप्ती करून घेता येते. स्वयं-अध्ययनास वाव मिळतो, शोधक वृत्तीचे संगोपन होते. या बाबींवर आणखी प्रकाश टाकता येईल. पण दुसरी बाजू लक्षात घेणे पण महत्त्वाचे आहे.

लहान मुले, ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. अनेक मुलांकडे लॅपटॉप, मोबाईल, इंटरनेट साधने नाहीत. शिक्षणावर होणाऱ्य इतर खर्चासाठी जे बजेट राखले जाते त्यात शिक्षण संस्था आणि ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने ही बाब काही अंशी पूर्ण करता येते.

दुसरा प्रश्न विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा. स्क्रिनवर सतत पाहून डोळ्यांचे काय होईल ? यासाठी एकच पर्याय तासिकांमध्ये अंतर ठेवणे. काही वेळानंतर हिरव्या रंगाचे, काही पाहणे, डोळ्यांचे व्यायाम करणे हे आपण करु शकतो. शेवटी माणूस हा समुहप्रिय प्राणी आहे. एकट्याने अशा माध्यमांशी चिकटून राहून तो एकलकोंडा बनण्याची शक्यता असते.

नवीन तंत्रज्ञान जेंव्हा जेंव्हा पुरविण्यात येते तेंव्हा तेंव्हा ते शाप की वरदान असा प्रश्न उभा राहतो. तेंव्हा एकच उत्तर देता येते योग्य वापर वरदान अतिवापर शाप !

येणारा काळ हा डिजीटल युगाकडे नेणारा काळा आहे हे खरे असले तरी त्याला मर्यादा आहेत. सभोवतालच्या समूहात राहणे, नैतिक संस्कार, सहकार्य भावना रुजणे, त्याच्या व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक असते. निकोप स्पर्धात्मक दृष्टीकोन, सहकार्य भावना, सहिष्णुता, अभिव्यक्तिस मुक्तांगण मिळणे, मित्र-मैत्रिणींसोबतच्या गप्पा झोकून देऊन प्रेम करणे, ध्येयासाठी वेडं होणे यासाठी साथ, सहवास माणसाच्या सानिध्यात असणे ही एक महत्त्वाची गरज दुर्लक्षिता येणार नाही. सामाजिक, सार्वजनिक आयुष्यातील मूल्यशिक्षण त्याच्या व्यक्तिमत्त्वास महत्वाचे ठरते. यादृष्टीने प्रत्यक्ष शिक्षणाची गरज आहेच पण प्राप्त परिस्थितीत ही संधी आहे. तंत्रज्ञानाशी रुळण्याची तिचा सराव झाला तर पारंपारिक अध्ययन-अध्यापनाला पुढे याची जोड देणे खूपच उत्तम ठरू शकते. गुणवत्ता उंचावायची असेल तर ऑनलाईन अध्ययन-अध्यापनाची जोड हवीच ! असे त्यांना वाटते.

आपल्याकडे विद्यापीठ अभ्यासक्रमातून मिळणारे ज्ञान आणि जगात लागणारी गुणवत्ता यात नेहमीच तफावत दिसून येते. ऑनलाईन शिक्षण पद्धती, इंटरनेटचा वापर. थोडक्यात डिजीटल ट्रेण्डचा वापर ही दरी भरून काढू शकेल असे मला वाटते.

**निष्कर्ष :**

१. पारंपारिक अध्ययन-अध्यापनास डिजीटल माध्यमांची जोड गुणवत्ता वाढीस उपयुक्त.
२. अध्ययन-अध्यापनात डिजीटल ट्रेण्ड अनुसरण्यास प्राप्त परिस्थितीकडे संधी म्हणून पहावे. प्राप्त परिस्थिती अध्ययन-अध्यापनात डिजीटल ट्रेण्ड अनुसरण्याची संधी समजावी.
३. अभ्यासक्रमातून मिळणारे ज्ञान आणि जगात लागणारी गुणवत्ता यातील दरी साधण्यास शिक्षणात डिजीटल ट्रेण्ड आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१. भाषाग्रहण व भाषाशिक्षण - रमेश पानसे
२. www.faceboook.com / ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठान, ref. date ०२.०१.२०२०